# एसटीचे खासगीकरण होऊ देणार नाही- सरनाईक

**मुंबई–** राज्य शासनाचा अंगीकृत सार्वजनिक उपक्रम असलेली असलेली एसटी सुमारे ८३ हजार कर्मचाऱ्यांची मातृसंस्था आहे. भविष्यात एसटीचे कदापि खासगीकरण होणार नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये! असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काल केले. मुंबईतील परळ बसस्थानकामध्ये कामगार नेते भाई जगताप यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे यांच्या पुढाकाराने कर्मचारी व प्रवाशांसाठी जलशीतकाचे लोकार्पण करताना मंत्री सरनाईक बोलत होते. यावेळी राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे , प्रादेशिक व्यवस्थापक यामिनी जोशी विभाग नियंत्रक अभिजीत पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

एसटीचा कर्मचारी अत्यंत मेहनती आहे. तो काम करीत असलेल्या ठिकाणी त्याला मुलभूत सोयी - सुविधा पुरविणे ही एसटी प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे चालक-वाहक विश्रांती गृह, तेथील प्रसाधनगृह स्वच्छ असली पाहिजेत. त्यासाठी आपण लवकरच खाजगी स्वच्छता संस्था नेमत असून त्यांच्याकडून विश्रांती गृहाच्या स्वच्छतेबरोबर कर्मचाऱ्यांचे गणवेश स्वच्छ धुवून इस्त्री करून कर्मचाऱ्यांना देण्याबाबत व्यवस्था करण्यात येणार आहे. एवढेच नाही तर कर्मचाऱ्यांचे दाढी व केश कर्तनाची व्यवस्था देखील स्वच्छता संस्थेच्या वतीने करण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या मुलभूत गरजाकडे अशाप्रकारे लक्ष दिल्यास कर्मचाऱ्यांसाठी कामगिरी करणाऱ्यांसाठी अनुकूल मानसिक परिस्थिती निर्माण करणे शक्य होते. अर्थात, याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या कार्यपद्धती मध्ये होऊन त्यांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले. तसेच यापूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले होते की, यासाठी एसटी महामंडळात पंचवार्षिक योजना तयार केली जाईल. महामंडळात कोणत्याही प्रकारे बसेस भाड्याने न घेण्याचा निर्णय घेतला.नवीन बसेस खरेदी करताना, पुढील पाच वर्षांत रद्द (प्रवासी सेवेतून काढून टाकल्या) जाणाऱ्या बसेसचाही विचार करावा. या संदर्भात व्यापक अभ्यास करून पंचवार्षिक योजना तयार करावी. जाहिरात धोरणातील इतर बाबी तपासल्या पाहिजेत आणि त्यातून मिळणारा महसूल १०० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य निश्चित केले पाहिजे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्त्यांवरील टोलमधून महामंडळाच्या बसेसना सूट मिळावी यासाठी केंद्र सरकारशी संपर्क साधावा. तसेच, डिझेलवरील व्हॅटमध्ये सवलत देण्यासाठी राज्य सरकारला प्रस्ताव पाठवावा. एसटी महामंडळाकडे प्रत्येक डेपोमध्ये एक डिझेल पंप आहे. व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य ठरणारे डिझेल पंप सुरू करून महसूल वाढवण्याचे पर्याय निर्माण करावेत. या संदर्भात इंधन कंपन्यांशी करार करावा, अशी सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केली.

# भात पिकाच्या निर्मितीकरिता जलद संकरीकरण कार्यक्रम राबविणे आवश्यक- डॉ. शरद गडाख

**राहुरी (तालुकाप्रतिनिधी)–** नवीन वाणांची निर्मिती करताना जलद संकरीकरण कार्यक्रम राबवून कमी वेळेत वाण निर्मिती करणे गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना लवकर तयार होणारे, कीड रोगास प्रतिकारक असलेले आणि अधिक उत्पादन देणारे विविध प्रकारचे भाताचे वाण उपलब्ध होतील. याकरिता जलद संकरीकरण कार्यक्रम राबविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.



पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ येथील कृषी संशोधन केंद्रास कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी भेट दिली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प, गणेशखिंड येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर आणि कृषी संशोधन केंद्र, वडगाव मावळचे प्रभारी अधिकारी डॉ. तुकाराम भोर उपस्थित होते.

कृषि संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांशी बोलताना संशोधन केंद्रातून विकसित झालेले फुले कोलम, फुले मावळ-७, फुले मावळ-८ या नवीन वाणांचा प्रसार करण्यासाठी या वाणांचे मोठ्या प्रमाणावर बीजोत्पादन करून बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश कुलगुरूंनी दिले. त्यांनी यावेळी इंद्रायणी या वाणाला करपा रोगप्रतिकारक व सुवासिक असा पर्यायी वाण विकसित करण्यासाठी संशोधनावर भर देण्याकरिता सुचविले.

या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. गडाख यांनी संशोधन केंद्रातील विविध संशोधन प्रकल्पांचा व कार्याचा आढावा घेतला. त्यांनी संशोधन केंद्राच्या विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकार्यांना निर्देश दिले. यावेळी डॉ. तुकाराम भोर यांनी कृषी संशोधन केंद्रातील विविध संशोधन प्रकल्प व भात बीजोत्पादन कार्यक्रम याविषयी सादरीकरण केले. यावेळी संशोधन केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरुन

### गट-गणांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर

निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार आहे. दुसरीकडे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर होताच इच्छुक कामाला लागले असून प्रभाग रचनेबाबत अडचणी असल्यास जिल्हाधिकारी अथवा तहसीलदार यांच्याकडे हरकती घेता येणार आहे. यासाठी सात दिवसांचा कालावधी राहणार आहे.

**गट आणि समाविष्ट ग्रामपंचायती**

**अकोले– समशेरपुर** : पाचपट्टावाडी, तिरडे, पेढेवाडी, म्हाळुंगी, पाडोशी, सांगवी, केळी रुम्हणवाडी, टहाकरी, घोडसरवाडी, समशेरपुर, मुथाळणे, कोकणवाडी, चंदगिरवाडी, एकदरे, पिंपळदरावाडी, जायनावाडी, शेणीत बु, खिरविरे, कोंभाळणे, लाडगाव, देवगाव, बाभुळवंडी, आंबेवंगण, मान्हेरे, टिटवी, शेलविहीरे, पिंपरकणे. देवठाणः सावरगाव पाट, देवठाण, गर्दणी, खानापूर, टाकळी, ढोकरी, बहिरवाडी, मेंहेंदुरी, विरगाव, हिवरगाव, डोंगरगाव, गणोरे, पिंपळगाव निपाणी, तांभोळ, रेडे, सुगाव खुर्द, कुंभेफळ. **धामणगाव आवारी**: कळस खुर्द, कळस बु, मनोहरपुर, सुगाव बु, परखतपुर, वाशेरे, नवलेवाडी, धुमाळवाडी, औरंगपुर, उंचखडक बु, उंचखडक खुर्द, पिंगळगाव नाकविंदा, शेरणखेल, म्हाळादेवी, निळवंडे, निंब्रळ, रुंभोडी, इंदुरी, विठे, अंबड, धामणगाव आवारी. **राजूर**: रणद बु, कोदणी, माळेगाव, कोहंडी, दिंगबर, चितळवेढे, जामगाव, राजुर, केळुंगण, कातळापुर, तेरूंगण, गुहीरे, वारंघुशी, जहागीरदारवाडी, बारी, पेंडशेत, चिचोंडी, वाकी, शेंडी, मुरशेत, पांजरे, उडदावणे, घाटघर, शिंगणवाडी, साम्रद, रतनवाडी, कोलटेंभे, मुतखेल, भंडारदरा. **सातेवाडी**: कुमशेत, अंगीत, शिरपुंजे बु, धामणवन, सावरकुटे, मवेशी, गोंदोशी, कौठवाडी, साकिरवाडी, चिंचावणे, वांजुळशेत, खडकी बु, शिसवद, पाचनई, लव्हाळी ओतूर, पाडाळणे, शेलद, पैठण, घोटी, तळे, कोहणे, शिळवंडी, सोमलवाडी, आंभोळ, आंबित खिंड, पळसुंदे, सातेवाडी, केळी कोतूळ, केळी ओतूर. **कोतूळ**: कोतूळ, धामणगाव पाट, मोग्रस, पांगरी, पिंपळगाव खांड, लिंगदेव, लहित बु, चास, बोरी, वाघापुर, लहित खुर्द, भोळेवाडी, नाचणठाण, मन्याळे, कळंब, पिंपळदरी, करंडी, खुंटेवाडी, ब्राम्हणवाडा, जांभळे, चैतन्यपुर, बेलापुर, बदगी, जाचकवाडी.

**संगमनेर– समनापुर**: निमोण, कर्हे, सोनवाडी, पळसखेड, सोनोशी, पिंपळे, पारेगाव बु, पारेगाव खुर्द, समनापूर, कुरण, सुकेवाडी, खांजापूर, मालदाड, सायखिंडी, निंभाळे, नान्नज दुमाला, काकडवाडी. **तळेगाव:** तळेगाव, चिंचाली गुरव, देवकौठे, तिगाव, करुले, वडझरी बुद्रूक, वडझरी खूर्द, कासारे, पोखरी हवेली, लोहारे, मिरपूर, वडगाव पान, माळेगाव हवेली, निळवंडे, कौठे कमळेश्वर, मेंढवण, कोकणगाव. **आश्वी बुद्रूक:** आश्वी बुद्रूक, प्रतापपुर, चिंचपुर बुद्रूक, सादतपुर, औरंगपुर, निमगाव जाळी, आश्वी खुर्द, शिबलापुर, पिंप्री लौकी अजमपुर, खळी, झरेकाठी, चणेगाव, दाढ खुर्द, कोंची, शेडगाव. **जोर्वे:** जोर्वे, कोल्हेवाडी, रहिमपुर, उंबरी, ओझर खुर्द, अंभोरे, मालुंजे, डिग्रस, पिंपरणे, ओझर बुद्रूक, कनकापुर, कनोली, पानोडी, मनोली, हंगेवाडी, रायते, वाघापुर, कोळवाडे. **घुलेवाडी:** घुलेवाडी, गुंजाळवाडी, ढोलवाडी (एन.व्ही.), कासारदुमाला, वेल्हाळे. **धांदरफळ बुद्रूक:** धांदरफळ बुद्रूक, राजापुर, जवळे कडलग, निमगाव भोजापुर, चिकणी, वडगाव लांडगा, पिंपळगाव कोंझिरा, सांगवी, कौठे धांदरफळ, धांदरफळखुर्द, चिखली, मंगळापुर, निमगाव बुद्रूक, निमगाव खुर्द. **चंदनापुरी:** संगमनेर खुर्द, रायतेवाडी, जाखुरी, हिवरगाव पावसा, निमगाव टेंभी, शिरापुर, चंदनापुरी, सावरगाव तळ, झोळे, खांडगाव, नांदुरी दुमाला, पेमगिरी, सावरचोळ, शिरसगाव, निमज, मिर्झापुर, खराडी, देवगाव. **बोटा:** आंबी खालसा, कौठे खुर्द, सावरगाव घुले, माळेगाव पठार, सारोळे पठार, महालवाडी, जवळे बाळेश्वर,वरुडी पठार, पोखरी बाळेश्वर, पिंपळगाव माथा, कौठे बुद्रूक, खंदरमाळवाडी, बोटा, आंबी दुमाला, म्हसवडी,कुरकुटवाडी, अकलापुर, कुरकुंडी, भोजदरी, वनकुटे, घारगाव, बोरबनवाडी. **साकूर:** पिंपळगाव देपा, कौठे मलकापुर, दरेवाडी, रणखांबवाडी, माडवे बुद्रूक, शिंदोडी, वरवंडी, खरशिंदे, खांबे, कर्जुले पठार,डोळासणे, साकूर, हिवरगाव पठार, जांबूत बुद्रूक, नांदूर खंदरमाळ, जांभुळवाडी, बिरेवाडी, शेंडेवाडी. **कोपरगाव– सुरेगाव:** सुरेगाव, वेळापुर, हंडेवाडी, मायगाव देवी, कारवाडी, मंजूर, धामोरी, रवंदे, चासनळी, वडगाव, बक्तरपुर, सांगवी भुसार, मोर्वीस, मळेगाव थडी, सोनारी. **ब्राम्हणगाव:** ब्राम्हणगाव, खिर्डी गणेश, धारणगाव, येसगाव, टाकळी, नाटेगाव, दहेगाव बोलका, पढेगाव, शिरसगाव, तिळवणी, आपेगाव, ओगदी, आंचलगाव, बोलकी, गोधेगाव, करंजी बु., कासली. **संवत्सर:** वारी, धोत्रे, भोजडे, लौकी, खोपडी, कान्हेगाव, तळेगाव मळे, घोयेगाव, उक्कडगाव, संवत्सर, सडे, कोकमठाण. **शिंगणापुर:** शिंगणापुर, मुर्शतपुर, डाउच बु., चांदगव्हाण, जेउर पाटोदा, डाउच खुर्द, घारी, कोळपेवाडी, माहेगाव देशमुख, मढी बु, हिंगणी, कोळगाव थडी, कुंभारी, शहाजापूर. **पोहेगाव बु.**: चांदेकसारे, शहापूर. मढी खुर्द, देर्डे चांदवड, देर्डे कोर्हाळे, जेऊर कुंभारी, सोनेवाडी, वेस, पोहेगाव बु., मनेगाव, रांजणगाव देशमुख, धोंडेवाडी, अंजनापूर, जवळके, बहादरपूर, बहादाराबाद, काकडी. **राहाता– पुणतांबा**: सावळीविहीर बु., सावळविहीर खुर्द, रुई, शिंगवे, पिंपळवाडी, पुणतांबा, न.पा.वाडी, एकरूपे, रामपूरवाडी, रांजणगाव खु. **वाकडी** : वाकडी, चितळी, जळगाव, धनगरवाडी, लोहगाव, बाभळेश्वर बु, राजुरी, रांतणखोल. **साकुरी**: अस्तगाव, पिंपळस, खडकेवाके, दहिगाव कोर्हाळे, कोर्हाळे, वाळकी, डोर्हाळे, कनकुरी, साकुरी, नांदुर्खी बु, नांदुर्खी खुर्द, निमगाव कोर्हाळे, निघोज. **लोणी खु.** : लोणी बु., पिंपरी निर्मळ, आडगाव बु, आडगाव खुर्द, पिंपरी लोकाई, केलवड बु, लोणी खुर्द, गोगलगाव. **कोल्हार बु.**: दाढ बु, हणमंतगाव,, हसणापूर, चंद्रापूर, दुर्गापूर, पाथरे बु., तिसगाव, कोल्हार बु.,भगवतीपूर, ममदापूर. **श्रीरामपूर– उंदिरगाव**: निमंगाव खैरी, महांकाळवडगाव, माळेवाडी, मातुलठाण, रामपूर, जाफराबाद, सराला, नाऊर, नायगाव, गोंडेगाव, गोवर्धणपूर, उंदिरगाव, माळवडगाव, हरेगाव, मुठेवडगाव, घुमनदेव, भामाठाण, खानापूर, कमलपूर. **टाकळीभान**: टाकळीभान, कारेगाव, खोकर, भोकर, निपाणीवडगाव, वडाळामहादेव, मातापूर. **दत्तनगर**: दत्तानगर, शिरसगाव, दिघी, ब्राम्हणगाव वेताळ, भैरवनाथनगर, उक्कलगाव, मांडवे, एकलहरे, फत्याबाद, कुरणपूर, खंडाळा, गळनिंब, कडीत खुर्द. **बेलापूर**: बेलापूर बु., बेलापूर खुर्द, बळदगाव, पढेगाव, मालुंजा बु., खिर्डी, लाडगाव, भेर्डापूर, कान्हेगाव, उबंरगाव, वांगी बु., वांगी खुर्द, गुजरवाडी. **नेवासा– बेलपिंपळगाव** : बेलपिंपळगाव, घोगरगाव, जैनपूर, बैलपांढरी, सुरेगाव गंगापूर, गोधेगाव, उस्थळ खालसा, भालगाव, बकुपिंपळगाव, मुरमे, बहिरवाडी, सलाबतपूर, जळके खुर्द, जळके बु., गळनिंब, गिडेगाव, टोका, गोगलगाव, मंगळापूर, खेडलेकाजळे, प्रवरासंगम. कुकाणाः कुकाणा, अंतरवली, कडुले, चिलेखनवाडी, जेऊर, तरवडी, नांदुरशिकारी, सुलतानपूर, सुकळी बु., शिरसगाव, गोपाळपूर, खामगाव, रामडोह, वाकडी, प्रिप्री शहाली, गेवराई, पाथरवाले, वरखेड. **भेंडा बु.** : भेंडा बु., भेंडा खु. सौंदाळ, देवगाव, नजिक चिंचोली, शहापूर, दिघी, मुकिंदपूर, बाभुळखेड, नागपूर, मक्तापूर, पिचडगाव, गोंडेगाव, खुणेगाव, रांजणगाव, कारेगाव, खडका. **भानसहिवरे** : भानसहिवरे, माळीचिंचोरा, उस्थळदुमाला, नविन चांदगाव, नारायणवाडी, हंडीनिमगाव, सुरेशनगर, निपाणी निमगाव, पाचेगाव, पुणतगाव, नेवासा बु., गोमाळवाडी, चिंचबन, खुपटी, लेकुरवाळी आखाडा, जायगुडे आखाडा, गोणेगाव, निंभारी. **खरवंडी** : खरवंडी, हिंगोणी, कांगोणी, वडाळा बहिरोबा, बर्हाणपूर, रस्तापूर, म्हाळसापिंपळगाव, करजगाव, गणेशवाडी, लांडेवाडी, बेल्हेकरवाडी, पानेगाव, तामसवाडी, शिरेगाव, अंमळनेर, खेडलेपरमानंद, वाटापूर. **सोनई** : सोनई, शिंगणापूर, घोडेगाव, झापवाडी, मोरेचिंचोरे, लोहगाव, पानसवाडी, धनगरवाडी, वंजारवाडी. चांदा : चांदा, लोहारवाडी, राजेगाव, शिंगवेतुकाई, फत्तेपूर, वांजोळी, कौठा, मांडेगव्हाण, देडगाव, तेलकुलगाव, पांचुदा, माका, महालक्ष्मी हिवरे, देवसडे. **शेवगाव– दहिगाव ने** : दहिगाव ने, विजयपुर, रांजणी, सुलतानपूर बु.,मजलेशहर, शहरटाकळी, ढोरसडे, भाविनिमगाव, घोटण, एरंडगाव समसुद, एरंडगाव भागवत, लाखेगाव, बोडखे, ताजनपूर, दादेगाव, खुंटेफळ, दहिफळ जुने, दहिफळ नवीन, तळणी, खानापूर, कन्हेटाकळी, न. बाभुळगाव, कुरुडगाव. **बोधेगाव** : मुंगी, गदेवाडी, दहिगाव-शे, खडके, मडके, राक्षी, चापडगाव, प्रभुवडगाव, लक्षमापूरी, खामपिंप्री जुनी, खामपिंप्री नवीन, पिंगेवाडी, सोनविहीर, बोधेगाव, कांबी, बालमटाकळी, गा. जळगाव, सुकळी, हातगाव.. **भातकुडगाव** : भातकुडगाव, देवटाकळ, हिंगणगाव ने, खामगाव, बक्तरपूर, जोहरापूर, भायगाव, लोळेगाव, सामनगाव, आखातवाडे, निंबे, ढोरजळगाव ने, वडूले बु., अमरापूर, वडूले खुर्द, बर्हाणपूर, आव्हाणे बु., आव्हाणे खूर्द, सुलतानपूर खुर्द, भगुर, वाघोली, वरूर बु., ढोरजळगाव शे, मळेगाव. **लाडजळगाव**: खरडगाव, सालवडगाव, माळेगाव ने, आखेगाव, वाडगाव, ठा. निमगाव, सोनेसांगवी, वरखेड, हसनापूर, कोळगाव, थाटे, मंगरूळ खुर्द, मंगरूळ बु., अंतरवाली बु., बेलगाव, लाडजळगाव, अंतरवाली खु.शे, शिंगोरी, अधोडी, दिवडे, शेकटे बु., चेडेचांदगाव, राणेगाव, गोळेगाव, शेकटे खुर्द, कोनाशी, नागलवाडी, ठा. पिंपळगाव. **पाथर्डी: कासार पिंपळगाव** कासारपिंपळगाव, पाडळी, डांगेवाडी, चितळे, सुसरे, सोमठाणे नलावडे, साकेगाव, सांगवी बु., खेर्डे, ढवळेवाडी, कोरडगाव, औरंगपूर, पागोरी पिंपळगाव, जिरेवाडी, निपाणी जळगाव, सोनोशी, तोंडोळी. **भालगाव**: भालगाव, खरवंडी कासार, मुंगूसवाडे, मालेवाडी, एकनाथवाडी, मिडसांगवी, जवळवाडी, ढाकणवाडी, भारजवाडी, अकोला, शेकटे, मोहोजदेवढे, भुतेटाकळी, नांदुर निंबादैत्य, कारेगाव, येळी, पिंपळगव्हाण, जांभळी. **तिसगाव**: माळीबाभूळगाव, हत्राळ, सैदापूर, मढी, घाटशिरस, शिरापूर, निवडूंगे, रांजणी, धामणगाव, केळवंडी, तिसगाव, सोमठाण सुर्द, मोहोज बु., मोहोज खुर्द, कडगाव, राघोहिवरे, खांडगाव, कौडगाव आठरे, मांडवे, देवराई, पारेवाडी. **मिरी:** मिरी, रेणुकावाडी, शंकरवाडी, आडगाव, जवखेडे दुमाला, जवखेडे खालसा, हनुमान टाकळी, कामत शिंगवे, कोपरे, शिंगवे केशव, करंजी, डोंगरवाडी, डमाळवाडी, लोहसर, शिराळ, चिचोंडी, गितेवाडी, दगडवाडी, धारवाडी, वैजूबाभूळगाव, भोसे, कोल्हार, सातवड. **टाकळीमानूर:** माणिकदौंडी, पत्र्याचा तांडा, मोहरी, घुमटवाडी, लांडकवाडी, पिरेवाडी, शिरसाठवाडी, चितळवाडी, आल्हणवाडी, जाटदेवळे, बोरसेवाडी, धनगरवाडी, मोहटे, टाकळीमानूर, चुंभळी, अंबिकानगर, चिंचपुर पांगूळ, चिंचपुर इजदे, भिलवडे,पिंपळगाव टप्पा, तिनखडी, जोगेवाडी, वडगाव, करोडी. **नगर–नवनागपुर**: देहरे, नांदगाव, शिंगवे, विळद, कर्जुने खारे, इसळक, निमगाव घाणा, पिंप्री घमुट, नवनागापुर, वडगाव गुप्ता, पिंपळगाव माळवी, मांजरसुबा. **जेऊर:** जेउर, धनगरवाडी, डोंगरगण, इमामपुर, बहिरवाडी, ससेवाडी, मजले चिंचोली, खोसपुरी,पांगरमल, उदरमल, आव्हाडवाडी, बुर्हाणनगर, शेंडी, पोखर्डी, पिंपळगाव उजैणी, वारुळवाडी, कापुरवाडी, देवगाव, रतडगाव. **नागरदेवळे:** नागरदेवळे, वडारवाडी, बाराबाभळी, शहापुर केकती, मेहेकरी, बारदरी, पिंपळगाव लांडगा, सोनेवाडी, खांडके, रांजणी, माथणी, भातोडी पारगाव, पारगाव भातोडी, पारेवाडी, कौडगाव, कोल्हेवाडी, सारोळा बद्दी, आगडगाव. **दरेवाडी:** दरेवाडी, बुरुडगाव, वाकोडी, अरणगाव, खंडाळा, चिचोंडी पाटील, आठवड, सांडवे, मांडवे, उक्कडगाव, नारायणडोह, निंबोडी, वाळूंज, टाकळी काझी, मदडगाव, दशमीगव्हाण. **निंबळक:** निंबळक, हमीदपुर, नेप्ती,जखणगाव, हिंगणगाव, खातगाव टाकळी, टाकळीखातगाव, हिवरेबाजार, पिंपळगाव वाघा, चास, भोयरेखुर्द, भोयरे पठार, पिंपळगावकौडा, कामरगाव, भोरवाडी, अकोळनेर, सोनेवाडी,(चास), निमगाव वाघा. **वाळकी** : वाळकी, बाबुर्डी घमुट, खडकी, सारोळा कासार, बाबुर्डी बेंद, घोसपुरी, हिवरेझरे, देउळगाव सिध्दी, तांदळीवडगाव, गुंडेगाव, राळेगण, वडगाव तांदळी, दहिगाव, पारगाव मैला, शिराढोण, साकत खुर्द, वाटेफळ, रुईछत्तीसी, गुणवडी, आंबिलवाडी, मठापिप्री, हातवळण. **राहुरी– टाकळीमिया** : कोल्हार खुर्द, चिंचोली, गंगापूर, पिंपळगाव, दवणगाव, संक्रारपूर, आंबी, अमळनेर, केसापूर, चांदेगाव, करजगाव, ब्राम्हणगाव भांड, बोधेगाव, टाकळीमिया, मुसळवाडी, लाख, जातप, त्रिंबकपूर, मालेगाव, मालुंजी, महालगाव, वाघाचा आखाडा. **राहुरी:** मानोरी, आरडगाव,वळण, मांजरी, वांजुळपोई, तिळापुर, कोपरे, पाथरे खुर्द, खुडसर गाव, ब्राह्मणी, केंदळ बु., केंदळ खू., पिंपरी वळण, चंडकापूर, कोंढवड, शिलेगाव, तांदुळवाडी, **ब्राह्मणी:** देसवंडी, तमन्ना आखाडा, गुहा, चिंचविहिरे, गणेगाव, कणगर बु., वडनेर, वर शिंदे, ताराबाद. **गुहा:** खडकवाडी, तांभेरे, सात्रळ, माळेवाडी, सोनगाव, धानोरे, निंभोरे, तुळापूर, तांदूळने, कानडगाव, रामपूर, बारागाव नांदूर, बारागाव नांदूर, कुरणवाडी, मल्हारवाडी, मोमीन आखाडा, घोरपडवाडी, चिंचाळे, गडदे आखाडा, औथर, जांभळी, दरडगाव थडी, महेशगाव, चिकलठाण, कोळेवाडी, दिग्रस, राहुरी खुर्द, रवंडी, पिंपरी अवघड, सडे. **वांबोरी:** उंबरे, धामोरी खुर्द, धामोरी बुद्रुक, बाबुळगाव, खडांबे बुद्रुक, खडांबे बुद्रुक, कुक्कडवेढे, केडगाव, मोकळवळ, वांबोरी, कात्रड, गुंजाळे. **पारनेर–** कर्जुले हर्या, पिंपळगाव रोठा, टाकळी ढोकेश्वर, नांदूर पठार, सावरगाव, पोखरी, कातळवेढा, पळसपुर, म्हसोबा झाप, वारणवाडी, कारेगाव, गारगुंडी, कासारे, टाकळी ढोकेश्वर, वडगाव, ताळा, वासुंदे, ढोकी, दिसवडे, खडकवाडी, मांडवे, खूप, बोंद्रे, कोकणेवाडी, तीखोल, पळशी, वनकुटे, धोत्रे बु., ढवळपुरी, भाळवणी, माळकूप, पाडळी, कानूर, वडगाव, आमली, भांडगाव, जामगाव, शहांजपूर, सारोळा, अडवळी, दैठणे गुंजाळ, लोणी हवेली, गोरेगाव, डिकसळ, कानूर पठार, दरोडी, जवळा, पिंपरी पठार, विरोली, हत्तलखिंडी, पुणेवाडी, पिंपळगाव, वेलदरे, वडगाव दर्या, पाडळी दर्या, आकलनवाडी, करंदी, किनी, वडझिरे, जाधववाडी, बाभुळवाडी, जवळा, सांगवी सूर्या, गांजी भोयरे, देवी भोईरे, चिंचोली, पिंपरी जलसेन, वडूले, सिद्धेश्वर वाडी, पिंपळनेर पानोली, निघोज, आळकुटी, वडनेर, चुंबुत, रेनवडी, शिरापूर, शेरी, कासारे, कळस, पाडळी, आळे, रांधे, पाबळ, लोणी मावळा, मस्केवाडी, गारखेंड, निघोज, पठारवाडी, गुणुरे, कोहेकडी, मसे खुर्द, राळेगण थेरपाळ. **सुपा** : राळेगणसिद्धी, वाडेगव्हाण, कुरुंद, यादव वाडी, नारायणगव्हाण, पाडळी, रांजणगाव, पळवे बु, कडूस, पळवे, कुप, मावळेवाडी, सातेगाव, म्हसणे, वडनेर हवेली, गटेवाडी, घाणेगाव, वाघुंडे खुर्द, व बुदुक सुपा, हंगा, मुळशी, वाळवणे, रायतळे, अस्तगाव, पिंपरी, गवळी, रांजणगाव मशीद, बाबुर्डी, भोयरे गांगर्डा. **जामखेड –जवळा** : चोंडी, मतेवाडी, जवळा, डोणगाव, अरणगाव, पाटोदा, फकराबाद, धानोरा, चोबेवाडी, मुंजेवाडी, बारले, रत्नापुर, कुसडगाव, खांडवी. **खर्डा:** खर्डा, लोणी, आपटी, वाकी, बाळगव्हाण, सातेफळ, जातेगाव, पिंपळगाव, तरडगाव, सोनेगाव, जवळके, धनेगाव, दिघोळ, मोहरी, नान्नज, पाटेवाडी, गुरेवाडी वाघा, राजेवाडी. **साकत–** साकत, मोहा, देवदैठण, सावरगाव, नाहुली, नायगाव, राजुरी, सारोळा, पाडळी खुरदैठण, धोंड पारगाव, झिक्री पिंपळगाव आवळा, घोडेगाव, बंदखडक, धामणगाव तेलंगशी जायभाय वाडी आनंदवाडी. **कर्जत– मिरजगाव–** निमगाव गांगर्डा घुमरी बेलगाव तिखी नागमठाण मांदळी चिंचोली रमजान थेरगाव रवळगाव कोंबडी खांडवी मिरजगाव कोकणगाव चांदी बुद्रुक चांदी बुद्रुक गुरव पिंपरी कौंडाने, मुळेवाडी, रांजनवाडी, नागलवाडी, नागापूर, बाबुळगाव, खालसा निंबोडी, तरडगाव मलठाण, टाकळी खंडेश्वरी, चिंचोली काळजात, डिकसळ सुपे, नवसरवाडी. **चापडगाव–** पाटेवाडी, जळगाव, निमगाव डाकू, चापडगाव, दिघीपाटेवाडी, खंडाळा, शितमपूर, भैरोबावाडी, कापरेवाडी, वालवड, रेहकुरी, वडगाव, तानपुरा, नांदगाव, माळेवाडी, भोसे, रुई गव्हाण, शिंदे, कोपर्डी. **कुळधरण–** कुलधरण, दुरगाव, धालवडी, राक्षसवाडी खू. राक्षसवाडी बु बारडगाव दगडी तळवडी जलालपुर. **कोरेगाव–** कोरेगाव बजरंग वाडी जळकेवाडी लोणी मसदपूर थेरवडी पिंपळवाडी खादगाव माळंगी निंबे आंबे जळगाव कुंभेफळ बेनवडी कोळवडी तोरकडवाडी देशमुख वाडी चिलवडी कोळपेवाडी, कानगुडेवाडी, सोनाळवाडी, आळसुंदे. **राशिन** : राशिन, परीटवाडी, बारडगाव सुद्रिक, कोपर्डी, कर्मनवाडी, वायसेवाडी, आखोणी, शिंपोरा, आवटेवाडी, खेड गणेशवाडी, भांबोरा, दुधवडी, सिद्धटेक. **श्रीगोंदा– येळपणे** : येळपणे, माठ उक्कडगाव, पिंपरी, कोलंदर, रायगव्हाण, राजापूर, राणेवाडी, ढवळगाव. **कोळगाव** : कोळगाव, चिखली, कोरेगाव, गोटेवाडी, सुरेगाव, उक्कलगाव, मुंगूसगाव, कोथुळ, पारगाव सुद्रिक, घारगाव, पिंपळगाव, पिसाविसापूर. **मांडवगण–** मांडवगण, महांडूळवाडी, तरडगव्हाण, चवर सांगवी, थेटे सांगवी, घोगरगाव, कामठी, रुईखेल, बांगरडे, बनपिंपरी ढोरजे, देऊळगाव, पिसोरे खांड, खांडगाव, तांदुळी दुमला, टाकळी लोणार, कोसेगव्हाण. **आढळगाव–** आढळगाव, कोकणगाव भावडी, हिरडगाव, घोडेगाव, गोठवी, वडाळी, सुरोडी, बेलवंडी, वडगाव, चांदगाव, पेडगाव, अधोरेवाडी, टाकळीकडे, वळीत, शेळगाव वेळू, चिकलठाणवाडी, चोराचीवाडी, आनंदवाडी. **बेलवंडी–** बेलवंडी, लोणी व्यंकनाथ, चिंबळे, हंगेवाडी, वांगदरी, मढेवडगाव, बोरी शिरजगाव बोडखा. **काष्टी–** काष्टी, सांगवी दुमला निमगाव खलू, गार, कौठा, लिंपणगाव, अजनुज, आर्वी, म्हातारपिंपरी बाबुर्डी.

### साखर कामगारांना मिळणार...

१८ टक्के पगार वाढ मिळावी अशी मागणी कामगार महासंघाची होती. तर साखर कारखाना व्यवस्थापन ७ टक्क्यांवर अडले होते. अखेर शरद पवार यांच्या लवादाने कामगारांना १० टक्के पगार वाढ देण्याचा निर्णय घेतला. यासह कामागरांना सर्व भत्ते देखील स्वतंत्रपणे देण्यात येणार आहेत. यामुळे पवार यांच्या लवादाचा निर्णय सर्वांनी मान्य केला आहे. ही पगार वाढ ही कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २०२४ पासून लागू होणार आहे. यामुळे कामगारांना १६ महिन्यांचा वाढीव पगाराचा फरकी मिळणार आहे. याबाबत आता सर्वांची पुन्हा २३ तारखेला बैठक होणार असून यात कामगारांच्या वाढीव करारावर कारखाना व्यवस्थापन, राज्य सरकार आणि कामगार महासंघाच्या स्वाक्षरी होवून हा निर्णय कागदावर येणार आहे. या १० टक्के पगार वाढीच्या निर्णयामुळे साखर कारखान्यांना सुमारे ४ हजार रुपयांपर्यंत वाढ मिळणार असल्याचा विश्वास कामगार महासंघाचे वायकर यांनी व्यक्त केला आहे.

### महाराष्ट्रात लवकरच धर्मांतरविरोधी कायदा

शौचालय साफ करायला लावणे, जातीवरून शिवीगाळ करणे, वाईट वागणूक देणे अशा फिर्यादीवरून ८ डिसेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या संस्थेतील अनियमितता तसेच सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यासंदर्भात तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या महिला पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास सुरू असून एका महिन्यात याचा चौकशी अहवाल प्राप्त होईल आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येईल, असेही पंकज भोयर यांनी सांगितले.

### भंडारदरा, मुळा पाणलोटात...

जोरदार सरी कोसळत होत्या. मुळा नदीचा कोतूळ येथील विसर्ग काल सकाळी १००० क्युसेस होता. तो सायंकाळी २२४७ क्युसेसपर्यंत वाढला होता.

### २५ ते ३० तोळे सोने...

हवालदार मनोज गोसावी, गणेश भिगारदे, रमीजराजा आतार, राहुरी येथील पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, सहा. पोलिस निरीक्षक सुदाम शिरसाट, पोलिस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, हवालदार विजय नवले, प्रमोद ढाकणे, संदीप ठाणगे आदींच्या पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. त्यानंतर अहिल्यानगर येथील ठसेतज्ज्ञ व श्वानपथकाने घटनास्थळी येऊन आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी सिमा नामक श्वान जागेवरच घुटमळले. त्यामुळे तपासकामात अडचणी निर्माण झाल्या. याप्रसंगी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, डॉ.तनपुरे कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे, संचालक हर्ष तनपुरे, रावसाहेब चाचा तनपुरे, माजी नगराध्यक्ष अनिल कासार, उपनगराध्यक्ष सूर्यकांत भुजाडी, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश पारख आणि शहरातील इतर व्यापारी व नागरिक घटनास्थळी उपस्थित होते.

या घटनेमुळे शहरातील व्यापारी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असून, या चोरांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी व्यापारी वर्गातून केली जात आहे. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी शहरातील प्रत्येक व्यापाऱ्याने आपल्या दुकानासमोर आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे लावून ते क्लाऊड यंत्रणेसोबत संलग्न करावे, असे आवाहन केले.

### सुप्रीममध्ये ऑगस्टला नियमित सुनावणी

ऑगस्टमध्येच सुनावणी होऊन निकाल यावा अशी उद्धव ठाकरे गटाची इच्छा आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयात ऑगस्टमध्ये शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत मुख्य सुनावणी पूर्ण होईपर्यंत महानगरपालिका निवडणुका आल्यास हा सर्वोच्च न्यायालय हा निकाल राखून ठेवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित असून आता याचा सोक्षमोक्ष लावायचा असल्याचे संकेत आज झालेल्या सुनावणीत दिले. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांच्याकडेच राहणार की उद्धव ठाकरे यांना परत मिळणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्टमध्येच निकाल जाहीर केला तर याचा परिणाम निवडणुकांवर होऊ शकतो. परंतु निकाल राखून ठेवला तर तो निवडणुका संपल्यानंतर म्हणजेच २०२५ वर्ष संपण्यापूर्वी अंतिम निकाल दिला जाऊ शकतो, असेही सांगितले जात आहे. ऑगस्टमधील अंतिम सुनावणीची तारीख दोन ते तीन दिवसांत निश्चित केली जाणार आहे.

### शुभांशु शुक्ला आज पृथ्वीवर परतणार

प्रवेशापूर्वी हीट शील्ड योग्य दिशेनं ठेवण्याची तयारी केली जाईल. क्सिऑम ४ मोहिमेची सुरुवात २५ जून २०२५ रोजी झाली, जेव्हा फाल्कन-९ रॉकेटनं फ्लोरिडाहून ड्रॅगन अंतराळयानासह उड्डाण केलं होतं. या मोहिमेनं भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्यासह आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधनात भारताचं स्थान अधिक दृढ केलंय. १८ दिवसांच्या या मोहिमेत अंतराळवीरांनी विविध वैज्ञानिक प्रयोग केले आणि अंतराळ स्थानकावर महत्त्वपूर्ण कार्य केलं. शुक्ला यांनी मिशन पायलट म्हणून यानाच्या नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावली, तर कमांडर पेगी व्हिटसन यांनी मोहिमेचं नेतृत्व केलं. पोलंड आणि हंगेरीच्या अंतराळवीरांनीही आपापल्या तांत्रिक कौशल्यांचा वापर करून मोहिमेच्या यशात योगदान दिलं.

**अंतराळ संशोधनातील भारताचा सहभाग**

या मोहिमेचे थेट प्रक्षेपण नासानं केलंय, ज्यामुळं जगभरातील प्रेक्षकांना अंतराळवीरांचा परतीचा प्रवास आणि तांत्रिक प्रक्रिया पाहण्याची संधी मिळाली. ड्रॅगन ग्रेस यानाची रचना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून, स्वायत्त जलावतरण आणि पुनर्प्राप्ती प्रक्रिया ही अंतराळ संशोधनातील प्रगती दर्शवते. या मोहिमेमुळं भारताच्या अंतराळ संशोधनातील सहभागाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे.

### अतिरिक्त धावा दिल्याने भारताचा पराभव

खालचे फलंदाज दोन्ही डावात फलंदाजीने चमत्कार करू शकले नाहीत. गोलंदाजी मजबूत होती, तरीही संघ पहिल्या डावात आघाडी घेऊ शकला नाही. इंग्लिश संघात जोफ्रा आर्चरचे पुनरागमन आणि लॉर्ड्सच्या खेळपट्टीवर नाणेफेक गमावणे हे देखील पराभवाचे कारण बनले. भारताने ६३ अतिरिक्त धावाही दिल्या.